MHRG030014922023

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | २३.०८.२०२३ |
| नोंदणी दिनांक | – | २४.०८.२०२३ |
| निकाल दिनांक | – | ०३.०८.२०२६ |
| कालावधी – ०२ व.  ११ म.  ११ दि. | | |

**तक्ता क्र. ३२**

**भाग 'अ'**

(प्रकरण ६, परिच्छेद ४४ (एक), फौजदारी नियम पुस्तीका)

<table>
<tr><td rowspan="2"></td><td colspan="2"><u>मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग यांचे न्यायालयात</u><br>(पिठासीन अधिकारी – डी.एम.झाटे)<br>(न्यायनिर्णय दिनांक ०३.०८.२०२६ रोजीचा)<br><br>नियमीत फौजदारी खटला क्र. १४७/२०२३<br>नि.क्र. ७२/ब</td></tr>
<tr><td colspan="2">रेवदंडा पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. ११५/२०२३ भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये</td></tr>
<tr><td>अभियोगपक्ष</td><td></td><td>महाराष्ट्र शासनमार्फत<br>रेवदंडा पोलीस ठाणे</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्रीमती स्नेहा नाईक | |
| आरोपी | | १. | कपिल रामकृष्ण बळी, वय ३६ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | २. | नितीन रामकृष्ण बळी, वय ४८ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ३. | रामकृष्ण गोमा बळी, वय ७० वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ४. | सुचिता कपिल बळी, वय ३५ वर्षे, व्यवसाय – मासेमारी/गृहिणी, |
| | | ५. | जयेश नारायण बळी, वय ४३ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ६. | नारायण गोमा बळी, वय ७८ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | ७. | दत्तात्रेय गोमा बळी उर्फ मिनानाथ, वय ७२ वर्षे, व्यवसाय – मासेमारी, आरोपी क्र. १ ते ४, ६ व ७ रा. थेरोंडा आगळ्याची वाडी, ता. अलिबाग, जि. रायगड |
| | | ८. | अनुसया नारायण बळी उर्फ अनू, वय ७५ वर्षे, व्यवसाय – मासेमारी/गृहिणी, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ९. | हेमंत नारायण बळी,<br>वय ५० वर्षे, व्यवसाय – मासेमारी, |
| | | | क्र. ५, ८ व ९ रा. हटाळे आंबेळीफाटा, नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड |
| विधिज्ञ | | आरोपींतर्फे श्री. परेश देशमुख | |

**भाग 'ब'**

(प्रकरण ६, परिच्छेद ४४ (दोन), फौजदारी नियम पुस्तिका)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०४.०५.२०२३ |
| फिर्याद दाखल तारीख | ०४.०५.२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २३.०८.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०९.०१.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १०.०६.२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०३.०८.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | -- |

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कपिल रामकृष्ण बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २ | नितीन रामकृष्ण बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३ | रामकृष्ण गोमा बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ५ | सुचिता कपिल बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ६ | जयेश नारायण बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ७ | नारायण गोमा बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | दत्तात्रेय गोमा बळी उर्फ मिनानाथ | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ९ | अनुसया नारायण बळी उर्फ अनू | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| १० | हेमंत नारायण बळी | फौ.प्र.सं. कलम ४१ अ (१) | ०९.०१. २०२४ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक ०३.०८.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये आरोप निश्चित करुन खटला चालविणेत आला आहे.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,

फिर्यादी पांडुरंग गणपत टिवलेकर, वय ४४ वर्षे, व्यवसाय–मासेमारी, रा. आगळ्याची वाडी, थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील रहिवासी आहे. दिनांक ०४.०५.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता आरोपी क्र. १ कपिल हा त्याच्या सामाईक भिंतीचे बांधकाम करत होता. त्यावेळी त्याला फिर्यादीने विचारले की, सदर भिंतीचे बांधकाम करु नको. त्यावेळी तो 'तुला काय करायचे ते कर, मी बांधकाम

करीन, तू मला बोलणारा कोण' असे बोलून त्याने व आरोपी क्र. २ ते ९ आणि विधिसंघर्षित बालक सुमित कपिल बळी यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून आरोपी क्र. १ ने त्याच्या हातातील फावडा फिर्यादीच्या हातावर मारला आणि त्याने फिर्यादीच्या भावजयीस लाथाबुक्क्याने मारहाण केली. आरोपी क्र. ३ याने दिपक टिवळेकर याला काठीने कपाळावर मारहाण केली. तसेच, आरोपी क्र. २ याने काठीने कावेरी हिच्या हातावर आणि इतर आरोपी यांनी हाताबुक्क्या व लाथांनी अंगावर, पाठीवर, डोक्यावर मारहाण करुन दुखापत केली आणि मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने रेवदंडा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने रेवदंडा पोलीस ठाणे येथे आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिताचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये गुन्हा रजि.नं. ११५/२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस.आर.पडवळ यांनी केला. त्यांनी वरील गुन्हयाचा तपास करुन तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये निशाणी १५ कडे दोषारोप निश्चित केले व ते आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितले असता त्यांनी दोषारोप नाकारुन खटला चालवण्याची तयारी दर्शवली. आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एकूण सहा साक्षीदार तपासले आहेत. आरोपींविरूद्ध कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे

आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

५. सरकारपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती स्नेहा नाईक आणि आरोपींतर्फे त्यांचा स्वतःचा युक्तीवाद ऐकला. वरील सर्व बाबींचा विचार करता या प्रकरणाच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | मौजे आगळ्याची वाडी, थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथे आरोपींनी फिर्यादी पांडुरंग गणपत टिवलेकर याच्या घराजवळ समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे घटक झाल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| २. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता दंगा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ३. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता प्राणघातक हत्यारांनी सज्ज होऊन दंगा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना काठी व फावड्यासारख्या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ५. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ६. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना अपमानास्पद भाषेत शिविगाळी करुन ते सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त होतील असे कृत्य केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |
| ७. | आरोपींनी समान उद्देशाच्या पूर्ततेकरीता बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | – | नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | अंतिम आदेश काय ? | – | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. १ ते ७ करीता</u>** –

वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यावरील निष्कर्ष एकत्रात देत आहे.

६. आरोपींनी फिर्यादी पांडुरंग गणपत टिवलेकर याच्या घराजवळ जाऊन बेकायदेशिर जमाव करुन त्या जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याकरीता फिर्यादी व साक्षीदारांना काठी व फावड्यासारख्या घातक हत्याराने तसेच हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवल्याचा व अपमानास्पद भाषेत शिविगाळी करुन त्यांना सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त केल्याचा तसेच, फिर्यादी व साक्षीदारांना फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याबाबत ठेवण्यात आलेले आरोप शाबित करण्याकरीता अभियोगपक्षाने एकूण सहा साक्षीदारांना तपासले आहे.

७. पांडुरंग (अ.सा. १) याच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना किती तारखेला घडली हे त्यांना आठवत नाही, त्यांना पडून मार लागला होता. त्यांनी फिर्याद दाखल केली होती. पांडुरंग (अ.सा. १) याने फिर्याद आणि छापिल फिर्यादवरील सही त्याची असल्याचे मान्य केले आहे परंतु, त्यातील मजकूर नाकारला

आहे.

८. फिर्यादी अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्याचा उलटतपास घेतला असता आरोपींनी त्याला फावड्याने मारहाण केल्याचे तसेच त्याची भावजय व इतर साक्षीदारांना काठीने मारहाण करुन शिविगाळी केल्याचे व आरोपींनी मारहाण केल्यामुळे त्याने फिर्याद दाखल केल्याचे नाकारले आहे. परंतु, त्याच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाल्याचे त्याने मान्य केले आहे.

९. प्रमिला (अ.सा. २), दिपक (अ.सा. ३), जितेंद्र (अ.सा. ४), करुणा (अ.सा. ५) व कावेरी (अ.सा. ६) हे आरोपींविरुध्द काही सांगत नाहीत. ते अभियोगपक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला असता त्यांच्यात व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे त्यांनी मान्य केले आहे. परंतु, आरोपींविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. बचावपक्षाने घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. ६४) आणि वैद्यकिय प्रमाणपत्र (नि.क्र. ६५ ते ७०) मान्य केले आहे. त्यावरुन पांडुरंग (अ.सा. १), प्रमिला (अ.सा. २), दिपक (अ.सा. ३), जितेंद्र (अ.सा. ४), करुणा (अ.सा. ५) व कावेरी (अ.सा. ६) यांना साधी दुखापत झाल्याचे व घटनास्थळ आगळ्याची वाडी, थेरोंडा येथील पांडुरंग (अ.सा. १) यांच्या राहत्या घराजवळ असल्याचे दिसून येत आहे. परंतु, फिर्यादी अथवा इतर साक्षीदार आरोपींविरुध्द काही सांगत नाहीत.

११. एकंदरीत अभिलेखावरील पुरावा विचारात घेतला असता आरोपींचा गुन्हयाशी संबंध जोडणारा कोणताही पुरावा अभियोगपक्षाने सादर केलेला नाही. अभिलेखाचे अवलोकन करता फिर्यादी व आरोपींची आपसात तडजोड झाल्याचे दिसते. त्यामुळे आरोपींवर ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वयेचे दोषारोप पुराव्याअभावी अभियोगपक्षाने शाबित केलेले नाहीत. म्हणून मुद्दा क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ८ करीता</u> –**

१२. आरोपींनी भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ अन्वये अपराध केल्याचे अभियोगपक्षाने पुराव्याअभावी शाबित न केल्यामुळे सर्व आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त मुद्देमाल एक लोखंडी फावडा याला लोखंडी पाते असल्याने सदर फावड्याची जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन आलेली रक्कम सरकारजमा करण्याबाबत तसेच, उर्वरित जप्त मुद्देमाल लाकडी काठ्या मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्याबाबत आदेश करणे योग्य होईल. करीता मुद्दा क्र. ८ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्र. १) कपिल रामकृष्ण बळी, क्र. २) नितीन रामकृष्ण बळी, क्र. ३) रामकृष्ण गोमा बळी, क्र. ४) सुचिता कपिल बळी, क्र. ५) जयेश नारायण बळी, क्र. ६) नारायण गोमा बळी क्र. ७) दत्तात्रेय गोमा बळी उर्फ

मिनानाथ, क्र. ८) अनुसया नारायण बळी उर्फ अनू आणि क्र. ९) हेमंत नारायण बळी यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १४९ नुसार केलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल फावडा जाहिर लिलावाद्वारे विक्री करुन आलेली रक्कम सरकारजमा करण्यात यावी.

४. उर्वरित जप्त मुद्देमाल लाकडी काठ्या मुल्यहिन असल्याने अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात याव्यात.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ मधील तरतुदीप्रमाणे प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/– चा जामीन द्यावा.

DATTA MADHUKARRAO ZATE

Digitally signed by DATTA MADHUKARRAO ZATE
Date: 2026.08.03 18:37:30 +0530

अलिबाग, (डी.एम.झाटे)

दिनांक – ०३.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग

# सूची–१

## भाग–क

(प्रकरण ६, परिच्छेद ४४ (तीन), फौजदारी नियम पुस्तीका)

## अभियोगपक्षातर्फे / आरोपीतर्फे साक्षीदार /न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोगपक्ष –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र. १ | पांडुरंग गणपत टिवळेकर | फिर्यादी | ५२ |
| सा.क्र. २ | प्रमिला जितेंद्र टिवळेकर | जखमी साक्षीदार | ५५ |
| सा.क्र. ३ | दिपक गणपत टिवळेकर | जखमी साक्षीदार | ५६ |
| सा.क्र. ४ | जितेंद्र गणपत टिवळेकर | जखमी साक्षीदार | ५७ |
| सा.क्र. ५ | करुणा पांडुरंग टिवळेकर | जखमी साक्षीदार | ५८ |
| सा.क्र. ६ | कावेरी जितेंद्र टिवळेकर | जखमी साक्षीदार | ५९ |

### ब. आरोपी साक्षीदार, जर असेल तर –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

### क. न्यायालयाचा साक्षीदार, जर असेल तर –

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | | |

# निशाण्यांची यादी

## अ. अभियोगपक्ष –

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ६४ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ६५ ते ७० | वैद्यकिय प्रमाणपत्र |

## ब. आरोपीपक्ष –

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## क. न्यायालयाची निशाणी –

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## ड. महत्वाच्या बाबी –

| अ.क्र. | महत्वाच्या बाबी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

DATTA MADHUKARRAO ZATE

Digitally signed by DATTA MADHUKARRAO ZATE
Date: 2026.08.03 18:37:39 +0530

अलिबाग,
दिनांक – ०३.०८.२०२६

(डी.एम.झाटे)
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग